# [ 6 ]

## ः श्री दत्ताची आरती ः

त्रिगुणात्मक त्रैमुर्ति दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा।
नेति नेति शब्द न ये अनुमाना ।
अखंड समाधी ध्यान मुनिजना ॥ 1 ॥

जय देव जय देव जय श्रीगुरूदत्ता |
आरती ओवाळीतां हरली भवचिंता ॥ जय देव ॥

सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त।
अभ्याग्यासी कैंची न कळे ही मात ।
पराही परतली तेथें कैंचा हा हेत।
जन्ममरणाचा पुरलासे अंत || जय देव ॥ 2 ॥

दत्त येउनियां उभा ठाकला।
साष्टांगें नमुनि प्रणिपात केला।
प्रसन्न होउनी आशीर्वाद दिधला।
जन्ममरणाचा बा फेरा चुकविला ॥ जय देव ॥ 3 ॥

दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान ।
हरपले मन झालें उन्मन।
मी तूं पणाची झाली बोळवण।
एका जनार्दनी श्री दत्त ध्यान ॥ जय देव ॥ 4॥